पुढारी

संक्षिप्त

# शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षेबाबतच्या निर्णयाकडे लक्ष



**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा)** : विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षेबाबत येत्या काही दिवसांत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. परीक्षेबाबत काय निर्णय होतो याकडे विद्यार्थी व पालकांचे लक्ष लागून राहिले आहे. विद्यापीठाच्या पदवीच्या अंतिम वर्षाच्या शेवट सत्र परीक्षा अद्याप झालेल्या नाहीत. अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत वेगवेगळे निर्णय घेतले जात आहेत. उच्चशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आपत्ती व्यवस्थानने घेतलेल्या निर्णयानुसार राज्य सरकार परीक्षा न घेण्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे यापूर्वीच सांगितले आहे. यूजीसी व केंद्र, राज्य सरकारच्या भूमिकेमुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांसह शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातून परीक्षेला बसणारे सुमारे ७५ हजार विद्यार्थी संभ्रमात आहेत. परीक्षेबाबतचा निर्णय होत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अडचणीत आले आहे.

Edition
Jul 28, 2020 Page No. 1
epaper.enavabharat.com

पुढारी

# पदवी प्रथम, द्वितीय वर्ष प्रवेशासाठी रजिस्ट्रेशन सुरू

## विद्यापीठाकडून लवकरच सूचनांचे परिपत्रक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बारावीच्या निकालानंतर व कोरोना लॉकडाऊन शिथिलतेनंतर पदवी प्रथम, द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरू झाली आहे. शिवाजी विद्यापीठाकडून प्रवेशाबाबत लवकरच मार्गदर्शक सूचनांचे परिपत्रक काढण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा व एटीकेटी, बॅकलॉगचा निर्णय शासनस्तरावरून अद्याप झालेला नाही. प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात संधी देण्यात आली आहे. विद्यापीठाकडून प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे निकाल तयार करण्यात आले आहेत. शासन निर्णय झाल्यानंतर गुणवत्तेनुसार अंतिम प्रवेश दिले जाणार आहेत.

बहुतांश महाविद्यालयांनी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशनला सुरुवात केली आहे. रजिस्ट्रेशनसाठी विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास सांगण्यात आले. यासाठी ऑनलाईनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. परंतु शहरातील काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात येण्यास सांगितले आहे. कोरोनाच्या संसर्गामुळे यास विरोध होत आहे. ऑनलाईन अर्ज भरताना अनेक अडचणी येत आहेत. ऑनलाईन पैसे भरताना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. महाविद्यालय कधी सुरू होणार हे अनिश्चित आहे. दरम्यान, उच्चशिक्षण सहसंचालकांनी प्राचार्यांच्या बैठकीत १ ऑगस्टपासून व्दितीय व तृतीय वर्षाचे वर्ग सुरु करण्याबाबत सूचना दिल्याचे समजते.

### कागदपत्रांसाठी विद्यार्थी, पालकांची धावपळ

बारावीचा निकाल जाहीर झाला, त्यानंतर जिल्ह्यात आठवडाभर लॉकडाऊन होते. लॉकडाऊन शिथिलतेनंतर पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यात विद्यार्थी, पालकांची धावपळ सुरू झाली आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी लागणारी आवश्यक सर्व कागदपत्रे एकत्र करताना विद्यार्थी दिसत आहेत.

# विद्यापीठ, आयसोलेशन कोविड केअर सेंटरला आयुक्तांची भेट

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठ वसतिगृह १, २, ३ व आयसोलेशन येथील कोविड केअर सेंटरला आज आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी भेट दिली. त्यांनी तेथील पॉझिटिव्ह रुग्णांशी संवाद साधला. येथील सेवा सुविधांबाबत रुग्णांशी चर्चा केली. तसेच सेंटरवरील सुविधेबाबत त्यांच्या काही सूचनाही ऐकून घेतल्या. तेथील डॉक्टर्स, नर्स व इतर स्टाफशीही त्यांनी संवाद साधला.**

कोविड केअर सेंटरमधील रुग्णांची रोग प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी त्यांनी योगा करावा. आहाराची काळजी घ्यावी. आपली प्रतिकारशक्ती कशी वाढेल याबाबत काळजी घ्यावी. डिप्रेशन येऊ नये



म्हणून काय काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच आपल्या घरच्यांचीही काळजी घेऊ, त्यांच्यावर लक्ष ठेवू असे आयुक्तांनी सांगितले. येथील डॉक्टर्स व नर्सशी संवाद साधताना सर्वांनी आपआपली काळजी घ्यावी. याठिकाणी असलेल्या रुग्णांची काळजी घ्यावी, दैनंदिन मार्गदर्शन करताना महिला व पुरुषांना स्वतंत्ररीत्या मार्गदर्शन करण्याच्या सूचना केल्या.

यानंतर कोविड रुग्णांना विद्यापीठच्या कॅन्टीनमधून चहा, नाष्टा, जेवणाची व्यवस्था केली जाते तेथेही आयुक्तांनी भेट देऊन जेवणाचा दर्जा तपासला. चहा, नाष्टा, जेवणाबाबत रुग्णाच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता जयंत खाड, सहायक आयुक्त अवधूत कुंभार, अन्न व औषध निरीक्षक डॉ. कर्गे, डॉ. सुशांत रेवडेकर, डॉ. बाबासाहेब लांब, डॉ. संभाजी पाटील उपस्थित होते.

आयसोलेशन कोविड केअर सेंटर व येथे घेण्यात स्वॅबच्या ठिकाणीही आयुक्तांनी भेट दिली. यावेळी येथील रुग्णांशी संवाद साधून त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांची, चहा, नाष्टा, जेवणाची व्यवस्थेबाबत विचारपूस केली. तसेच याठिकाणी नूतनीकरण करण्यात येत असलेल्या रुग्णालयाचीही पाहणी केली. हे रुग्णालय १ ऑगस्टला सुरु होईल, यादृष्टीने येथील उर्वरित कामे युद्धपातळीवर तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत यांना दिल्या. दरम्यान, सरनोबत व अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई यांनीही या केंद्राची पाहणी करुन काम गतीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी डॉ. रमेश जाधव उपस्थित होते.



# पदवी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया ऑगस्टमध्ये

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यातील पदवी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया दरवर्षी जुलैअखेरपर्यंत पूर्ण होत असते. यंदा मात्र कोरोनाच्या संसर्गामुळे बारावीचा निकाल उशिरा लागल्याने पदवी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया ऑगस्टमध्ये सुरु करण्यात येणार आहे. विद्यापीठ अंतर्गत १६१ महाविद्यालयात जवळपास ६० हजार विद्यार्थी प्रवेश घेतील, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.



- कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची माहिती
- ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पद्धतीने प्रवेश प्रक्रिया
- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सूचनांचे पालन करणे बंधनकारक

कोरोनाचा वाढता संसर्ग लक्षात घेता यंदाचे शैक्षणिक वर्ष उशिरा सुरू होणार आहे. राज्य शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी)च्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पध्दतीने पदवी प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. त्यामुळे ज्या महाविद्यालयात ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी सर्व साधनसामग्री उपलब्ध आहे, त्या महाविद्यालयांनी पदवी प्रथम वर्षाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. ज्या महाविद्यालयात ऑनलाईन सुविधा नाही त्या महाविद्यालयांनी ऑफलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. मात्र राज्य शासनाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या लॉकडाऊनसंदर्भात घालून दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे. विद्यापीठाने महाविद्यालयाला दिलेल्या राखीव कोट्यावरील जागेवर नियमानुसार प्रवेश देणे महाविद्यालयांना बंधनकारक आहे.

पुढारी

# ‘विद्यापीठ परिसरातील रिकामी निवासस्थाने दुरुस्त करून राखीव ठेवा’

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील रिकामे होस्टेल, निवासस्थानांची दुरुस्ती करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवण्यात यावीत, अशी मागणी विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

कोरोना विषाणूचा संसर्ग वाढत आहे. विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी दैनंदिन कामकाजासाठी विद्यापीठात येतात. त्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून रिकामी निवासस्थाने राखीव ठेवावीत. या मागणीचे निवेदन कुलसचिवांना देण्यात आले आहे.

यावेळी विलास सोयम, एस. आय. कोळी, एस. आर. सूर्यवंशी, एस. जे. माने, एस. पी. सरनाईक, एम. पी. कदम, अनिल साळोखे आदी उपस्थित होते.

Edition
Jul 28, 2020 Page No. 1
epaper.enavabharat.com